CMYK

बीड । शुक्रवार
१८.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : १०८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# विजय पवार प्रशांत खाटोकर यांना जामीन मंजूर अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणाची आज होणार सुनावणी

**● एसआयटी पथक दोन दिवसापासून बीडमध्ये मुक्कामी ; ● आतापर्यंत कोणाची चौकशी व जवाब नोंदवले !**

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल प्रकरणात न्यायालयीन अल्पवयीन मुलीचा विनयभंग प्रकरणी कोठडीत असलेले विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोघांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राला काळिंबा फसल्याने या घटनेने बीड जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ



उडाली होती. बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये बारावीचे शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीने विजय पवार व खाटोकर यांच्याकडून लैंगिक छळ झाल्याची तक्रार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल केली होती. त्यानंतर या दोघांना पोलिसांनी मांजरसुंबा परिसरातून अटक केल्याचे दाखवून

▶▶ उर्वरित पान २ वर

### ● एसआयटीचा तपास गुप्त

दोन दिवसापासून सातपुते नामक महिला अधिकारी बीडमध्ये उमाकिरण लैंगिक छळ प्रकरणाचा तपास करत आहे. हा तपास अत्यंत गुप्त पद्धतीने सुरू असून पोलीस व मीडियालाही यापासून लांब ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत एसआयटी पथकाने कोणाचे जवाब नोंदवले यासह कोणाची चौकशी केली हे सर्व बंद पाहिलेत असून एसआयटी पथकाने नेमके कोणाला भेटले कोणाकडून माहिती घेतली याचा संपूर्ण तपशील बाहेर येणे आवश्यक आहे. एसआयटी पथक बीड शहरात तळ ठोकून असताना बीड न्यायालयाने दोन्ही आरोपींची जामीन मंजूर केली आहे.

### ● अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात आज सुनावणी

उमाकिरण संकुल येथील अल्पवयीन मुलीच्या छळ प्रकरणी आरोपी विजय पवार व प्रशांत खाटोकर यांना जामीन मंजूर करण्यात आली आहे. आज न्यायालयात अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात सुनावणी होणार आहे अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात जामीन मंजूर न झाल्यास विजय पवार यांचा मुक्काम तुरुंगातच वाढणार आहे. राज्यभर गाजलेल्या या शैक्षणिक अल्पवयीन अत्याचार प्रकरणात दोन्ही आरोपींना जमीन मंजूर झाला असला तरीही अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात नेमके आज काय होणार याकडे बीड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

## पाटोद्यात शासन निर्णयाला केराची टोपली? पारधी समाजातील दिव्यांग युवकांवर अन्याय : जीलानी शेख यांचा सवाल

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील पारधी समाजातील दिव्यांग युवकांला २५ जुलै २००७ च्या शासन परिपत्रकानुसार २०० चौ.फुट जागा अत्यल्प भूभाड्यावर विना लिलाव देणे अपेक्षित असताना, आजतागायत त्यांना हक्काचे घर मिळालेले नाही, ही अत्यंत दुर्दैवी व दुःखद बाब असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जीलानी शेख यांनी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शासनाचे परिपत्रक असूनही स्थानिक प्रशासन आणि नगरपंचायत यांच्याकडून दुर्लक्ष केले जात आहे. शेकडो दिव्यांग व्यक्ती आजही घराविना, उघड्यावर किंवा अस्थायी निवाऱ्यांमध्ये राहतात, हे सामाजिक न्यायाच्या



दृष्टीने लाजिरवाणे आहे, असा आरोपही शेख यांनी केला. दिव्यांग हक्कासाठी आम्ही झगडतोय, सरकारच्या परिपत्रकाचे काय उपयोग जर अंमलबजावणीच होत नसेल? पारधी समाजातील आमचे दिव्यांग बांधव अजूनही घराच्या प्रतीक्षेत आहेत, हे शासनाच्या अपयशाचे प्रतीक आहे, – जीलानी शेख, अध्यक्ष, दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र ते पुढे म्हणाले की, शासनाने जारी केलेल्या २५ जुलै २००७ च्या परिपत्रकात स्पष्ट उल्लेख आहे की, दिव्यांग नागरिकांना अत्यल्प भूभाड्यावर २०० चौ. फूट क्षेत्रफळाची जागा विना लिलाव द्यावी. परंतु याचे पालनच होत नसल्यामुळे दिव्यांग समाजात प्रचंड नाराजी आहे.या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यात आली असून, येत्या काळात जर योग्य कार्यवाही झाली नाही तर दिव्यांग संघर्ष समिती राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## ज्ञानेश्वरी मुंडेंची खा.सोनवणेंनी घेतली भेट; भाऊ म्हणून पाठीशी राहण्याचा शब्द

**जिल्हा रूग्णालयात सुरू आहेत उपचार, योग्य उपचार करण्याचे डॉक्टरांना सुचना**



बीड । प्रतिनिधी

परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी (दि.१६) सकाळी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर कुटुंबासह आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून

▶▶ उर्वरित पान २ वर

● माझ कुटूंबच या लोकांनी उध्दस्त केले. मी न्यायासाठी रोज प्रशासनाच्या दारात जाते. सोबत लेकरांना घेवून जाते, तरीही या निर्दयी लोकांना मायेचा पाझर फुटत नाही. गरीबांसाठी न्याय असतो का नाही, हेच कळायला तयार नाही. रोज पोलीस ठाण्यात जाताना लेकरांची शाळा बुडत आहे. अशावेळी माझ्या मनाला प्रचंड वेदना होतात.
–ज्ञानेश्वरी मुंडे.

### ● अन् खा.सोनवणेंनी पुसले डोळे

उपचार घेत असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेवून खा.सोनवणे हे बाहेर पडत असताना ज्ञानेश्वर मुंडे यांच्या आईचीही सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी मुंडेच्या आईंनी हंबरडा फोडला. माझ्या लेकरांना न्याय द्या, पोलीस काहीच करत नाहीत, असे म्हटले. यावेळी आईचा हंबरडा पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते. दरम्यान, सोनवणे यांनी त्यांचे अश्रू पूसत मी तूमच्या सोबत आहे. खचून जावू नका, असा विश्वास दिला.

## खालेद फारोकी यांचा माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश





बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या हस्ते समाजसेवक खालेद फारोकी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यात आले यावेळी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित मोईन मास्टर सहाब पटनेते फारोक पटेल अमर नाना नाईकवाडे अशपाक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली धडाडीचे कार्यकर्ते खालेद फारोकी यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केल्यानंतर ठीक ठिकाणी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले शुभेच्छा देताना शाहेद पटेल बरकत पठाण सादेख सर नजर चाचु शकील पठाण शेख इलियास या सह अनेकांनी शुभेच्छा चा वर्षाव केला आहे.

## ढेकनमोह - जुजगव्हाण शिव पानंद रस्ता तहसीलदार शेळके यांनी केला खुला

**● एक वर्षा पासून सुरु असलेला वाद अखेर मिटला**

बीड । प्रतिनिधी

तहसीलदार शेळके यांनी गुरुवारी (१७ जून रोजी ) ढेकणमोहा ग्राम पंचायतला भेट देऊन गावातील लोकांच्या समस्या व पिक विमा संदर्भात अडचणी जाणून घेतल्या . गावातील लोकांचे फार्मर आयडी काढुन घेण्याचे आवाहन केले . ढेकणमोहा–जुजगव्हाण शिवेवरुन जाणारा अंतर्गत वादाने अडवलेल्या रस्त्याची तक्रार प्रलंबित होती . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सुनावणी घेवुन रस्ता खुला



करण्याचा आदेश दिला होता . तथापि काही शेतकऱ्यांनी आपसात असलेल्या वादामुळे शिवरस्ता होऊ दिला नव्हता सुमारे तीन किलोमीटर रस्त्यांपैकी एक किलोमीटर रस्ता लोकसहभागातून करण्याचे राहून गेले असल्याचे शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले .

कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिम अंतर्गत हा रस्ता तात्काळ सामोपचाराने या वेळी खुला करण्यात आला. महाराष्ट्राचे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची ,शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत . विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न महसूल अधिकाऱ्यांमार्फत सोडवण्यास सुरुवात केली आहे.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार

▶▶ उर्वरित पान २ वर

## अज्ञात रोड रोमियो कडुन पाठलाग करुन शाळकरी मुलींची छेड़छाड़ पोलीसात गुन्हा दाखल

**शाळा व नविन बस स्थानक परिसरात दामिनी पथक नेमण्याची पालक वर्गातुन मागणी**



तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत सातत्याने विविध प्रकारचे आणेक गुन्हे दाखल होत असतात परंतु फिर्यादी व आरोपी यांच्याकडून अर्थिक तडजोड करता यावी म्हणून की काय पत्रकारांना वारंवार मागणी करुन देखील प्रेस नोट दिल्या जात नाही. वास्तविक पाहता गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी काही पोलीस बंधु कसोशीने प्रयत्णरत आसतात. त्यांच्या याच कार्याला ऊजाळा मिळावा या हेतुने अम्ही संपर्क करत असतो तरी देखील माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते.

बीड । प्रतिनिधी


गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत जवळपासच्या गावातुन शिक्षण घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात विध्यार्थ्यींनी व विध्यार्थ्यी तलवाडा या ठिकाणी येतात. काही गावातुन या विध्यार्थ्यांसाठी बसेसची व्यवस्था आहे तर काही गावातील विध्यार्थ्यांना पाई चालत ४,५,७,९ कि. मी. पर्यंत शिक्षण घेण्यासाठी तलवाडा या ठिकाणी यावे लागते. आस्यातच शाळेत येतांना व जातांना सड़कछाप रोड रोमियो कडुन रस्त्यात आडऊन मुलींच्या छेड़छाड़ीच्या घटना घडत असुन शिक्षक, पालक, व पोलीसाकडे तक्रार केल्यास आपले शिक्षण बंद होऊन शैक्षणिक नुकसान होईल या भितीने विध्यार्थ्यींनी पुढे येत नसल्याने या समस्याचा फायदा घेऊन रोड रोमियो कडुन प्रतिदिन मुलींच्या छेड़छाड़ीच्या घटनेत वाढ होत असल्याचे दिनांक १५/७/२०२५ रोजीच्या एका घटने वरुन समोर आले आहे. शाळा

▶▶ उर्वरित पान २ वर




सुसज्ज आरसीसी इमारत भाड्याने देणे आहे

धानोरा रोड जिजाऊ नगर (शिराळेनगर) बीड येथील चार रुम खाली व चार रुम दुसऱ्या मजल्यावर शासकीय कार्यालय किंवा दवाखाना, मुला–मुलींचे वस्तीगृह, विविध कंपन्यांच्या कार्यालयांकरीता अथवा शाळेकरीता दोन मजली सुसज्ज आरसीसी इमारती भाडयाने देणे आहे.



संपर्क
हॉटेल जय महाराष्ट्र
नवनाथ अण्णा शिराळे ९८२२८७५९४५
गोरख आबा शिराळे ९४२२२९५२३०

CMYK

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष; गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आशेचा किरण

आपल्या समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना अचानक उद्‌भवलेल्या गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मोठे वैद्यकीय खर्च करावे लागतात. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे अनेकांना योग्य उपचार मिळविणे कठीण होते. याच गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष (Chief Minister Medical Assistance Cell) सुरू केला आहे. हा कक्ष खऱ्या अर्थाने अनेकांसाठी 'जीवनदायी' ठरत आहे, आणि यामागे एक सुव्यवस्थित यंत्रणा कार्यरत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्रः मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा मुख्य उद्देश हा राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रयत्न केले जातात. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि. 13 ऑगस्ट 2015 च्या परिपत्रक क्र. मुमंसनि-2015/प्र.क्र.1/निधी कक्ष नुसार गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत असून, या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची (Chief Minister's Relief Fund and Charitable Hospital Assistance Cell) उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेतः 1. आर्थिक दुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणेः राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारांसाठी आर्थिक सहाय्य देणे (जसे को कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, इत्यादी).

2. धर्मादाय रुग्णालयांमधील सुविधा वाढविणेः राज्यातील धर्मादाय (Charitable) रुग्णालयांना आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे.

3. सरकारी आणि खासगी यंत्रणांमधील समन्वयः वैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश.

4. आरोग्य सेवा उपलब्धतेत समता आणणेः गरीब, वंचित, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांनाही उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करणे.

5. सामाजिक जबाबदारी अंतर्गत रुग्णालयांकडून मदत मिळविणेः धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या CSR (Corporate Social Responsibility) अथवा Trust च्या माध्यमातून अधिकाधिक गरीब रुग्णांवर मोफत किंवा सवलतीने उपचार करावेत, यासाठी त्यांच्याशी समन्वय ठेवणे.

6. त्वरित निर्णयप्रक्रिया व पारदर्शकताः रुग्णांच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेणे व निधी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे.

आरोग्यासाठीच्या शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अर्ज करण्यापूर्वी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(1) डिस्चार्ज झालेल्या / उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अर्थसहाय्य देय नाही.

(2) महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना (मोफत उपचार):- या योजनेच्या आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास (ठाणे जिल्हा- डॉ. प्रियांका यादव, वैद्यकीय अधिकारी, संपर्क क्र.9561729824) फोन करून पेशंटला नामतालिकेवरील (Empanelled) दवाखान्यात ॲडमिट करावे. www.jeevandayee.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(3) चॅरिटी हॉस्पिटल (मोफत / सवलतीच्या दरात):- जिल्ह्यातील चॅरिटी हॉस्पिटलमधील उपलब्ध बेडबाबत माहिती चॅरिटी इन्स्पेक्टर / त्यांचे कार्यालयातून घेऊन त्यानुसार रुग्णास चॅरिटी बेड उपलब्ध असलेल्या दवाखान्यात ॲडमिट करावे. www.charity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(4) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) (मोफत उपचार):- 0 ते 18 वर्षे वयांपर्यतच्या पेशंटसाठी या योजनेंतर्गत मोफत उपचार केले जातात. www.rbsk.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

5. मुख्यमंत्री सहाय्यता निधी:- (1) कॉकलियर इम्प्लांट वय वर्षे 2 ते 6), (2) हृदय प्रत्यारोपण, (3) यकृत प्रत्यारोपण, (4) किडणी प्रत्यारोपण, (5) फुप्फुस प्रत्यारोपण, (6) बोन मॅरो प्रत्यारोपण, (7) हाताचे प्रत्यारोपण, (8) हिप रिप्लेसमेंट, (9) कर्करोग शस्त्रक्रिया, (10) रस्ते अपघात, (11) लहान बालकांची शस्त्रक्रिया, (12) मेंदूचे आजार, (13) हृदयरोग, (14) डायलिसिस, (15) कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), (16) अस्थिबंधन, (17) नवजात शिशुंचे आजार, (18) गुडघ्याचे प्रत्यारोपण, (19) बर्न रुग्ण (MLC), (20) विद्युत अपघात रुग्ण (MLC) या अशा एकूण 20 गंभीर आजारांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे आर्थिक सहाय्य केले जाते.

उपरोक्त तीनही योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून वैद्यकीय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते. संपर्क क्रमांकः 022-22026948 / व्हॉट्सॲप क्रमांकः 9049789567.

सद्यःस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास सुमारे 3 हजार 800 रुग्णालये संलग्नित आहेत. या रुग्णालयांची यादी वेबसाईटवर www.cmrf.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

* या योजनेचा लाभ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालये यांसारख्या इतर योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना दिला जातो, जेणेकरून मर्यादित निधीचा योग्य वापर होईल.
* रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर या निधीसाठी अर्ज करता येत नाही; उपचार सुरू असतानाच अर्ज करणे अपेक्षित आहे.

पात्रतेचे निकष आणि आवश्यक कागदपत्रेः मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घेण्यासाठी काही पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रे आहेतः

* उत्पन्नाचा दाखलाः अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. (तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.)
* आधार कार्डः रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे आधार कार्ड. लहान मुलांसाठी आईचे आधार कार्ड आवश्यक.
* रेशन कार्डः रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे रेशन कार्ड (केशरी किंवा पिवळ्या रंगाचे).
* वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्रः डॉक्टरांच्या सही-शिक्क्यानिशी मूळ वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक किंवा प्रमाणपत्र. खाजगी रुग्णालयाच्या बाबतीत, हे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
* संबंधित आजाराचे रिपोर्ट्सः आजाराशी संबंधित सर्व वैद्यकीय अहवाल (रिपोर्ट्स).
* अपघातग्रस्त असल्यासः FIR (First Information Report) किंवा MLC (Medico-Legal Case) रिपोर्ट आवश्यक.
* प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठीः ZTCC (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक.
* रुग्णालयाची नोंदः उपचार घेत असलेल्या रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. (फक्त नोंदणीकृत रुग्णालयेच मदत निधीसाठी पात्र असतात.)

अर्ज प्रक्रियाः मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठी अर्ज प्रक्रिया खालीलप्रमाणे आहेःअर्ज व आवश्यक कागदपत्रे aao.cmrf-mh@gov.in या ई-मेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे.

* अर्ज डाऊनलोड करावाः मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा विहित नमुन्यातील अर्ज संबंधित संकेतस्थळावरून (उदा. cmrf.maharashtra.gov.in) किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त करावा.
* कागदपत्रे जमा करावेतः अर्जासोबत वर नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित (Self Attested) करून जोडावीत.
* अर्ज सादर करावाः पूर्ण भरलेला अर्ज आणि कागदपत्रे आपल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता कक्षात सादर करावीत. काही जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची सोय देखील उपलब्ध आहे.
* अर्जाचा पाठपुरावाः अर्ज सादर केल्यानंतर त्याच्या स्थितीची माहिती घेण्यासाठी संबंधित कार्यालयात संपर्क साधता येतो. अनेक ठिकाणी यासाठी टोल फ्री क्रमांक किंवा ऑनलाईन 'अर्ज स्थिती' तपासण्याची सुविधा उपलब्ध आहे.

1. अर्ज (विहीत नमुन्यात).
2. रुग्ण दाखल असल्यास त्याचा Geo Tag फोटो सोबत जोडणे / पाठवणे बंधनकारक आहे.
3. निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (खाजगी रुग्णालय असल्यास सिव्होल सर्जन यांचेकडून हॉस्पिटल खर्चाचे अंदाजपत्रक प्रमाणित करणे आवश्यक आहे.)
4. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला घालू वर्षाचा (रुपये 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.)
5. रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे) लहान बाळासाठी (बाल रुग्णांसाठी) आईचे आधारकार्ड आवश्यक आहे.
6. रुग्णांचे रेशनकार्ड (महाराष्ट्र राज्याचे).
7. संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे.
8. अपघातग्रस्त रुग्णांसाठी FIR रिपोर्ट आवश्यक आहे.
9. प्रत्यारोपण रुग्णांसाठी ZTCC / शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे.
10. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री राहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी.

अर्थसहाय्याची मागणी ई-मेल द्वारे केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे PDF स्वरूपात (वाचनीय) पाठवून त्याच्या मूळ प्रती मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे टपालाद्वारे तत्काळ पाठविण्यात यावेत.

1 जानेवारी 2025 ते 30 जून 2025 दरम्यान मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने झालेली मदत

शेकडो गरीब व गरजू रुग्णांना दिलासाः-

1 जानेवारी 2025 ते 30 जून 2025 दरम्यान या सहा महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल 14 हजार 651 रुग्णांना 128 कोटी 6 लाख 68 हजार रुपयांची वैद्यकीय मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर करण्यात आली आहे.

FCRA सर्टिफिकेटमुळे परकीय देशातील देणगीचा मार्ग मोकळाः- जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीला FCRA प्रमाणपत्र मिळाले, महाराष्ट्र- एफसीआरए प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिले राज्य ठरले. त्यामुळे आता मुख्यमंत्री सहाय्यता निधीला परदेशातील व्यक्ती, संस्था, कंपन्यांकडून थेट आर्थिक मदत स्वीकारता येणार आहे.

'चरणसेवा' उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणीः- वारीच्या काळात 'चरणसेवा' उपक्रमाद्वारे 2.75 लाख वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा देण्यात आली, तर 10 लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य विषयक जनजागृती पोहोचविण्यात आली.

महत्वपूर्ण तांत्रिक सुधारणा ऑनलाईन पडताळणी प्रणालीः- जून महिन्यात उत्पन्न प्रमाणपत्रांची पडताळणी महसूल विभागाच्या ऑनलाईन प्रणालीशी थेट जोडण्यात आली. त्यामुळे बनावट दस्तऐवजांना आळा बसला असून पात्र रुग्णांना जलद मदत मिळू शकते.

धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यक्षमतेवर लक्षः-

धर्मादाय रुग्णालयांतर्फे देण्यात येणाऱ्या 10% मोफत आणि 10% सवलतीच्या उपचार सेवांची नियमित तपासणी व अहवाल प्रणाली अधिक सक्रिय करण्यात आली आहे.

एकूण मदतः- 148 कोटी 60 लाख 02 हजार

एकूण लाभार्थी संख्याः- 23 हजार 269

विभागः-

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी (CMRF),रुग्ण/लाभार्थी संख्या - 14 हजार 651 रूग्ण, मदत (रक्कम)-128 कोटी 6 लाख 68 हजार.

धर्मादाय, रुग्ण/लाभार्थी संख्या - 8 हजार 507 रूग्ण, मदत (रक्कम) - 15 कोटी 24 लाख 34 हजार.

नैसर्गिक/कृत्रिम आपत्ती, रुग्ण/लाभार्थी संख्या- 111 व्यक्तींना, मदत (रक्कम) - 5 कोटी 29 लाख.

एकूण - 23 हजार 269 लाभार्थी, मदत (रक्कम) - 148 कोटी 60 लाख 02 हजार.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष हे महाराष्ट्रातील गरजू रुग्णांसाठी एक महत्त्वाचे आणि संवेदनशील पाऊल आहे. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून, तसेच स्पष्ट पात्रता निकषांमुळे, ही योजना आर्थिक अडचणींमुळे कोणाचाही उपचार थांबू नये, यासाठी कार्यरत आहे. या कक्षाच्या माध्यमातून मिळणारी मदत खरोखरच अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

पान १ वरून पुढे...

## विजय पवार...

न्यायालयात हजर केले होते दोन वेळा पोलीस कोठडी मिळाल्यानंतर त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती.

गुरुवारी याबाबतीत न्यायालयासमोर आरोपीचे वकील ॲड.बाळासाहेब कोल्हे यांनी युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. यावर न्यायालयाने पवार आणि खाटोकर या दोघांना जामीन मंजूर केला आहे. प्रा. विजय पवार चा मुक्काम मात्र कोठडीच. अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणी प्रा. विजय पवार व खाटोकर याला न्यायालयाने जामीन मंजूर केला असला तरी विजय पवार वर एक अल्पवयीन मुलीच्या पालकाने ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला होता. त्याप्रकरणी विजय पवार याची न्यायालयात सुनावणी होणार असून ॲट्रॉसिटी ॲक्ट मध्ये जामीन होणार का ?हे पाहावे लागेल न्यायालयाने ॲट्रॉसिटी मध्ये जामीन दिली नाही तर विजय पवार चा मुक्काम न्यायालयीन कोठडीत वाढ होणे शक्यता आहे. जामीन अर्जावर सुनावणी दरम्यान आरोपींच्या वतीने प्रसिद्ध विधितज्ञ ॲड.बाळासाहेब कोल्हे यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपींना जामीन मिळावा अशी मागणी केली. त्यांना ॲड.गणेश कोल्हे, ॲड.संज्योत महाजन, ॲड.योगेश सुरवसे, ॲड.अभिजीत चौरे, ॲड.धनराज जाधव व ॲड.सोनवणे यांनी सहकार्य केले.

## ज्ञानेश्वरी मुंडेंची....

दि.१७ जुलै रोजी सायंकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी तुमचा भाऊ म्हणून मी पाठीशी असून तूम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी मी लढा देईल, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला.

पान १ वरून पुढे...

परळी येथील व्यापारी मुंडे यांचा ऑक्टोबर २०२३ मध्ये निर्घृण खून झाला होता. या घटनेला आता अठरा महिन्यांहून अधिकचा काळ लोटला आहे पण या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक झाली नाही. तपासाला विलंब होत असल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी सकाळी कुटुंबासह बीड पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलीसांनी रोखले परंतु त्यानंतर त्या गाडीत बसण्यासाठी गेल्या परंतु त्यांनी फ्रुटीच्या बाटलीत असलेले कोणते तरी विषारी द्रव केले आणि त्या जमिनीवर कोसळल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेले आहे. दि.१७ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईहून परतले. त्यांनी केजला न जाता आधी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. उपचार सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची त्यांनी भेट घेत अस्तेवाईकपणे चौकशी केली. ताई, तूम्ही आत्महत्या करण्याचा विचार करण्याआधी लेकरांच्या तोंडाकडे बघायचे होते. या लेकरांसाठी खंबिर व्हा, तूम्हाला न्याय देण्यात हे सरकार कमी पडत आहे. परंतु तूमच्या लढाईत मी स्वत: तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठिशी आहे, या लढाईत मी तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून लढेल, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

## ढेकनमोह - जुजगव्हाण...

स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावीत असे सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो. ग्राम महसुल सज्जा ढेकणमोहा अंतर्गत येणाऱ्या

पान १ वरून पुढे...

मौजे ढेकणमोहा व जुजगव्हाण या दोन गावांच्या शिवेवर असणाऱ्या ब्रम्हनाथ वस्ती कडे जाणारा पाणंद रस्त्याच्या मागणीवरून अर्जदार दादासाहेब नामदेव थापडे व इतर ७ जण यांनी केली होती . ढेकणमोहा – नाळवंडी रोडपासुन ते जुजगव्हाण तलाव पर्यंत जाण्यायेण्यासाठी पूर्वापार हा दक्षिण – उत्तर जाणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन गुरे–जनावरे व शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग , व्यवसाय करत आहेत . गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार चालत आलेला आहे परंतु तो रस्ता पुर्णपणे आमच्या बाजुच्या शेत जमिनीमधुन काढलेला आहे असे म्हणुन रस्ताचे सुरू असलेले काम बंद करुन खडी व मुरूम टाकु न देता तो मध्येच अडवला होता . गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदार यांनी स्वतः स्थळ पाहणी केली व अर्जदार व गैरअर्जदार यांना रस्त्याचे व दळणवळणाचे महत्त्व सांगुन रस्त्यामुळे शेती उत्पादन कसे वाढवावे याकडे लक्ष देण्यास सांगितले . त्याचे महत्त्व शेतकरी यांना कळाले . दोन्ही बाजुच्या शेतकरी यांना सामोपचाराने समजावून सांगितले व मागील वर्षाभरा पासून चालत आलेला वाद मिटवला . जाण्या– येण्यासाठी ढेकणमोहा व जुजगव्हाण या गावच्या शिवावरुन २० फुटाचा रस्ता करावा अशी भूमिका शेतकरी यांनी घेतली . त्यानुसार हा रस्ता करून देण्यात आला . तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , ढेकणमोहा यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करण्याबाबत यापूर्वीच आदेशित केले होते . तहसीलदार शेळके यांच्या आदेशानंतर स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले. यावेळी कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके , ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच शिवाजी

पान १ वरून पुढे...

गाडीवान , ग्राम विकास अधिकारी बाबुराव तांदळे , उपसरपंच परमेश्वर थापडे , तंटा मुक्ती अध्यक्ष कैलास देवकते , पोलीस जमादार चत्रभुज डापकर , ग्राम पंचायत सदस्य सतिश देवकते , अनंत करांडे , बळीराम थापडे , रावसाहेब थापडे , संजय शिंदे , मिलींद शिंदे , चत्रभुज थापडे , सिद्धेश्वर थापडे , दादासाहेब थापडे , गणेश थापडे , महादेव थापडे , नितीन थापडे , बापुराव थापडे , संदिपान थापडे , शिवाजी जाधव , भारत देवकते , गणेश गलांडे , रमेश गलांडे , दादा जाधव , भगवान थापडे , बालासाहेब थापडे तसेच आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके बीड यांचे आभार मानले .

## अज्ञात रोड...

सुटल्या नंतर काही मुली नेहमी प्रमाणे पाई चालत आपल्या गावाकडे जात आसतांना काही मुलांनी वाटेत आडऊन शाळकरी मुलींची छेड काढण्याचा प्रयोग केला. परंतु त्या रस्त्याने जाणा–या काही वाटसरुंच्या मदतीने मुलींनी हा प्रसंग हाणून पाडला पण हा प्रकार नित्याचाच झाल्याने या मुलींनी घडलेला प्रकार आपल्या कुटुबियास सांगितला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लागलीच पालकांनी मुलींना सोबत घेत दिनांक १६/७/२०२५ रोजी तलवाडा पोलीस स्टेशन येथे येऊन घडलेला घटनाक्रम सागुन अज्ञात रोड रोमियोंच्या विरोधात तक्रार देऊन गुन्हा दाखल करुन घेऊन दामिनी पथक नेमण्याची मागणी केली असल्याने मुलींनी सांगितलेल्या वर्णात्मक बाबी वरुन तलवाडा पोलीसांनी अज्ञात रोड रोमियोंच्या विरोधात विविध कलमान्याव गुन्हा दाखल केला असुन मुलींच्या सांगितलेल्या वर्ना नुसार पोलीस अज्ञात रोमियोंचा शोध घेत आहे.

पान ४ वरून पुढे...

## पत्रकारांसाठी रविवारी....

अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी आदी पत्रकारांसाठी असलेल्या योजनांबाबत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके माहिती देणार आहेत. या कार्यशाळेत सर्व पत्रकार बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## अनिलदादा जगताप...

निवासस्थान, मुंबई येथे उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शिंदे साहेबांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या आहेत, या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. यामुळे जबाबदारी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थावर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार करा आणि कामाला लागा. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान सर्वांना संबोधित केले.

## पाटोदा पंचायत...

वाढत आहे. पाटोदा तालुका विकासाच्या दृष्टीने मागे पडू नये यासाठी

पान ४ वरून पुढे...

ही इमारत तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. एकीकडे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांच्या इमारतींचे लोकार्पण मोठ्या उत्साहात केले, तर दुसरीकडे पाटोद्याची इमारत मात्र पावसात ओलसर होत,गंजत व उन्हाळ्यात धूळ खात पडून आहे.या इमारतीच्या वापरा बाबत तांत्रिक अडचणी नेमक्या काय आहेत, त्यावर कोण उपाययोजना करणार, आणि येणाऱ्या १५ ऑगस्टला अखेर उद्घाटन होणार का – हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## सेवा सप्ताह...

रंग पेन्सिल आदींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी राजकिशोर मोदी तथा ॲड राजेश्वर चव्हाण यांच्या संकल्पनेखाली सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तसेंच बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण,स्वच्छता, शिक्षण तथा सामाजिक जनजागृती यावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यातच दि १५ रोजी रक्तदान शिबीर आयोजित करून त्यात ६३ युवकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. बुधवार दि १६ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यापुढेही संपूर्ण सप्ताहभर अशाच विधायक उपक्रमांची मेजवानी असणार आहे. सेवा सप्ताह उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण तसेच

पान ४ वरून पुढे...

शालेय साहित्य वाटपाच्या कार्यक्रमात मनोज लखेरा, मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले,महादेव आदमाने, चंद्रकांत महामुनी, दिनेश भराडीया, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, कचरू सारडा, किशोर परदेशी, अंकुश हेडे, जावेद गवळी, पंडित हुलगुंडे, सुभाष पाणकोळी, खलील जाफरी, रशीद भाई,दत्ता सरवदे, गोविंद पोतंगले, रोहन कुरे,अकबर पठाण, विशाल पोटभरे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

## नारायण गडाची...

काढणार आहे यापुढे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्ष आपल्या सेवेसाठी तत्पर राहिन असे अभिवचन देतो . बाबा आपल्या गडाच्या पाठीशी लाखो भाविक भक्त आहेत, बदनामी करणारे लवकर उघडे पडतील व भक्त त्यांना माफ करणार नाहीत असे वरेकर यांनी सांगितले. यावेळी समवेत अँड. योगेश शेळके ,जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, माजी सरपंच सखाराम तात्या मोहिते हे उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य...

काम आंदोलनाची दखल न घेतल्यास दि १८ जुलै २०२५ पासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.या वेळी संघटनेचे अध्यक्ष आशा यादव, सचिव कृष्णा शिंदे, मीरा जाधव, उषा राठोड, रजिया शेख, छाया सानप, स्वप्निल गाडे, समीर सय्यद, दत्ता गवळी, रोशनी भालेराव, वसंत राऊत, खेलबा सोनटक्के,

पान ४ वरून पुढे...

संघमित्रा ताटे, वर्षा सौताडेकर, आशा भोसले, माधवी भोसले,सल्लागार दादासाहेब घोळवे, विश्रांती पवार, मेघा गुणाल, स्वप्ना आगाव, उषा गोचडे, अलका मेहकर.सह शेकडो परिचारिका उपस्थित होत्या.सह शेकडो परिचारिका आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

## उद्या वसंतराव...

होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष मा. श्री. रमेश भाऊ पोकळे तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. श्रीकांतजी डिसले सहाय्यक पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री. तेजाजी शिंदे उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत पुणे येथील आयटी क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. हिरेनजी केशरिया सीईओ वायर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड पुणे मा. श्री. गिरीषजी साळुंखे प्रकल्प व्यवस्थापक मा. श्र. निमीषजी हागे, मा. श्री. राहुलजी भालेराव, मा. श्री. गिरीशजी केळकर, मा. डॉ.श्री. रविंद्रजी खेडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन होणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील करिअरचे मार्ग,अत्याधुनिक उद्योग ट्रेंड, अनुभवी व्यावसायिकांद्वारे वैयक्तिक करिअर समुपदेशन होणार आहे. तसेच या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर निवड करण्यासाठी योग्य निर्णय क्षमता वाढण्यास देखील मार्गदर्शन होणार आहे. तेंव्हा विद्यार्थी– विद्यार्थिनींनी तसेच पालकांनी आणि आयटी क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान महाविद्यालय संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ऊर्जा क्षेत्रातील संशोधन व सहकार्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाचा कॅलिफोर्निया विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार

**मुंबई । प्रतिनिधी**

बर्कले येथील जागतिक कीर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाशी महाराष्ट्र शासनाने ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास क्षेत्रातील सहकार्यासंबंधी सामंजस्य करार केला आहे. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी ऊर्जा



राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी, महापारेषणचे संजीव कुमार आदी उपस्थित होते. श्रीमती शुक्ला आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

या करारामुळे महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला गती मिळणार आहे. उर्जेचा स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारा पुरवठा, ऊर्जा साठवणूक उपाय, वीज बाजार रचना, ग्रीड प्रसारण प्रणालीतील सुधारणा, हवामानाशी जुळवून घेणारी धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रम या क्षेत्रांमध्ये संयुक्त काम होणार आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात उर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि नवसंशोधनाला चालना मिळेल. या सामंजस्य करारामार्फत उर्जा साठवणूक, वीज बाजार, प्रसारण व्यवस्था आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये संयुक्त संशोधन, ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धी यांना चालना मिळणार आहे. स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने सहकार्याचा नवा अध्याय सुरू होत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. महाराष्ट्र सरकार आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले यांच्यातील हे सहकार्य परस्पर विश्वास, समानता आणि सामूहिक हिताच्या तत्त्वांवर आधारित असून, राज्याच्या उर्जा क्षेत्रातील बदलत्या गरजांनुसार स्थानिक उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

हा करार लवचिक स्वरूपाचा असून त्यामुळे भविष्यातील प्रकल्पांनुसार सहकार्याचे दरवाजे खुले राहतील. या करारामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रशासन यांना नवसंशोधन, क्षमता वृद्धी व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. त्यामुळे पर्यावरणस्नेही आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने राज्याचा प्रवास अधिक गतिमान होईल, असा विश्वास ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी व्यक्त केला. या सामंजस्य करारामध्ये खालील महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये ज्ञानसंपादन, संशोधन आणि प्रशिक्षणाची संधी मिळणार– स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या वीजेचा विकास, उर्जा साठवण तंत्रज्ञानावर संयुक्त संशोधन, वीज मार्केटची रचना आणि धोरण निर्मिती, ग्रीड प्रसारण क्षेत्रातील नवोन्मेष, हवामान अनुकूलता (climate resilience) उपाययोजना, कौशल्यविकास आणि प्रशिक्षण उपक्रम

## पैठणच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांची मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात बहुतांश भागात पेरणी झालेली आहे तर काही ठिकाणी धूळपेरणी झालेली आहे. मात्र पावसाने दडी मारल्याने मोठ्या प्रमाणावर पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. गेवराई तालुक्यासह इतर तालुक्यातील सुकणारी आणि करपणारी पिके वाचवण्यासाठी तात्काळ उजव्या कालव्यातून पाणी सोडावे अशी मागणी शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.

गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर सातत्याने आंदोलन करणारे शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी यापूर्वीही उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यासाठी पैठण येथील नाथसागराचे दरवाजे उघडण्याचे मोठे आंदोलन केले होते. त्यानंतर गेवराई तालुक्यातील उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांची मोठी नुकसान ठरले होते. पैठणच्या नाथसागरातून येणाऱ्या उजव्या कालव्यातून पाणी सोडल्यास या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळेल, अशी भावना या भागातील बहुतांश शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## माजलगाव बस स्थानकातून दीड तोळ्याचे लॉकेट लंपास !

**नूतन बस स्थानकाचे काम सुरू; सीसीटीव्ही नसल्याचा चोरांनी घेतला फायदा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव बस स्थानक येथें बस मध्ये बसत असताना सौ सरला जाजू यांचे दीड तोळ्याचे आजच्या बाजार भावा प्रमाणे अंदाजे दीड लाख रु चे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यानी चोरल्याची घटना बुधवारी १६ रोजी सकाळी ९ वाजता घडली.

याबाबत माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सौ जाजू यांनी दिलेल्या फिर्यादी मध्ये दि १६ रोजी सकाळी अंदाजे ९ वाजता बीड कडे जाण्यासाठी महामंडळाच्या इलेक्ट्रिक बस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने गळ्यातील दीड तोळ्याचे मंगळसूत्र चोरले असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय सहिंता कलम ३०३ नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल गोविंद पाखरे हे करत आहेत. हरात पाकीटमार गठन चोर यांची संख्या वाढली असून माजलगाव बस स्थानकात पोलीस कर्तव्य बजावत असल्याचे कवचित दिसते यामुळे चोराचे फावत आहे शिवाय बस स्थानक नूतनिकरणाचे काम सुरु झाल्यामुळे बस स्थानक परिसरातील सी सी टी व्ही मंगळवारी रात्रीच काढण्यात आले आहे.यामुळे येणाऱ्या काळात चोरांचे चांगलेच फावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



*बीड: शेवगाव निवासी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी वारी करून परतीच्या मार्गावर असतांना आज बीड शहरात मुक्कामी आहे. बालाजी मंदिर पेठ बीड या ठिकाणी दुपारच्या भोजनासाठी विसवली असता शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना दोन हजार मोतीचूर लाडू चे वाटप केले. यावेळी संजय महाद्वार, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश लोणकर, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर सह शिवसैनिक.*

## पाच वर्षापासून खुनाच्या गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला पकडले. बीड शहर डीबी पथकाची कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

सदर आरोपी याच्यावर पो.ठा. बीड शहर गु.र.नं. १६५/२०१४ भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, ५०४, ३४, २०१ अन्वये गंभीर स्वरूपाचे गुन्हा दाखल असून, त्यास जन्मठेप व १०,०००/- रूपये दंडाची शिक्षा मा. न्यायालयाने सुनावलेली आहे. सदरील प्रकरणांमध्ये स्वतः च्या बहिणीला आणि तिच्या प्रियकराला २०१४ मध्ये यातील आरोपीने ठेचून ठार मारले होते. ऑनर किलिंगचा हा प्रकार होता. परंतु खुनाच्या गुन्ह्यात शिक्षा झालेला हा आरोपी गेल्या सात वर्षापासून फरार झालेला होता.

पोलिसांचा ताबा चुकऊन तो फरार झाल्याने याबाबत पो. ठा. शिवाजीनगर, बीड येथे गु.र.नं. ७८१/२०१८ भा.दं.



वि. कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात मा. न्यायालय, बीड येथे उठझउ कलम २९९ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. तसेच जिल्हा शोधपत्र (उ-११०४०) देखील तयार करण्यात आले होते.

परंतु पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी याबाबत जे गंभीर गुन्ह्यात फरार आरोपी आहेत त्यांना पकडण्याची मोहीम काढलेली आहे. या मोहिमे अंतर्गत अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७/०७/२०२५ रोजी पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी एक विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश जाधव, पो.ह. गहिनीनाथ बावनकर, पो.अ. राम पवार या तपास पथकाने सतर्कपणे काम करत सदर फरारी आरोपी विठ्ठल उर्फ सोनू प्रकाश काळवणे यास शोधून ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीस अटक करून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून त्यास न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. या यशस्वी कारवाईबद्दल तपास पथकाचे व मार्गदर्शक अधिकाऱ्यांचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी अभिनंदन केले आहे.

## विधान भवनात आमदार आव्हाड व आमदार गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले !

**मुंबई । प्रतिनिधी**

मी काय तुला घाबरतो का, असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध चक्क विधानभवन परिसरातील लॉबीमध्ये भिडल्याचं पाहायला मिळालं. यावेळी, पडळकर समर्थकांकडून जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता असल्याच्या नितीन देशमुख यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर, दोन्ही बाजूने शिवीगाळ झाल्याचं पाहायला मिळाल, यावेळी येथील सुरक्षा रक्षकांनी पुढे येत ही भांडणे सोडवली. मात्र, तोपर्यंत घटना कॅमेऱ्यात कैद झाली आणि काही क्षणातच हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर, विरोधकांकडून घटनेचा तीव्र संताप व्यक्त होत असून मला मारण्याचा प्रयत्न झाल्याचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. आता, या घटनेवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यात कालच गाडीचा दरवाजा उघडण्यावरुन वाद झाला होता. यावेळी, दोघांमध्ये शिवीगाळ झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. तर, गेल्याच आठवड्यात जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभा परिसरातच अरे मंगळसुत्र चोराचा.. अशी घोषणाबाजी केल्याने दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये सोशल मीडियावर वॉर सुरू होते. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या या राड्याचे पडसाद आज चक्क विधानभवन लॉबी, परिसरात पाहायला मिळाले. त्यावरुन, येथील आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला असून थेट विधानसभा अध्यक्षांकडेही याबाबत मागणी करण्यात आली आहे. विरोधकांनी देखील या घटनेवरुन गृहमंत्री तथा मुख्यमंत्र्यांकडे कारवाईची मागणी केली आहे. आता, स्वत: मुख्यमंत्र्यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. विधिमंडळ परिसरात झालेल्या राड्यानंतर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढे येत प्रतिक्रिया दिली. घडलेली घटना योग्य नाही, मारामारी करणं, विधानभवनात करणं योग्य नाही. विधानसभा अध्यक्ष आणि सभापतींच्या अंतर्गत हा परिसर येतो, त्यांनी घटनेची दखल घ्यावी. अध्यक्षांनी कडक कारवाई करावी, अशी विनंती मी केली आहे. हे विधानसभेला शोभणारं नाही, त्यामुळे कारवाई झालीच पाहिजे, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी घडलेल्या प्रकारावर आपली भूमिका स्पष्ट केली.

## लोक जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री चिराग जी पासवान यांना Z+ सुरक्षा देण्यात यावी : राजेश वाहुळे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री चिराग पासवान साहेब यांना एका मातेफिरू ने जिवे मारण्याचे धमकी दिली आहे त्यामुळे सदर मातेफिरू वर कारवाई झाली पाहिजे पण या पाठीमागे कोणत्या आदर्श शक्ती असण्याची दाट शक्यता आहे बिहारमध्ये निवडणूक येऊ पाहत आहेत त्यामुळे अशा अज्ञात व्यक्तीकडून असे प्रकार केले जात आहेत त्यामुळे केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने याचा शोध लावून जनतेसमोर आणणे गरजेचे आहे आमच्या नेत्याच्या जीवास धोका असल्याने त्यांच्या सुरक्षेत आणखीन वाढ करून Z+ सुरक्षा केंद्रीय गृहमंत्री कार्यालयाने तातडीने करावी अशी मागणी लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री यांना राज्यपाल महोदय यांच्यामार्फत करण्यात येत आहे या आशयाचे निवेदन उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई जिल्हा बीड यांना देताना युवा चे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहूळे जिल्हाध्यक्ष अशोक काळे पाटील केज तालुका अध्यक्ष गंगाधर पोळ परळी विधानसभा तालुका अध्यक्ष विशाल शेवाळे विद्यार्थी तालुकाध्यक्ष आदित्य चौरे तालुका उपाध्यक्ष सागर मुद्गुले व शुभम तरकसे

# नफरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी गिरवला लोकशाहीचा धडा : शालेय मुख्यमंत्री पदासाठी केले मतदान

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी येथे शालेय मुख्यमंत्री पदाची निवडणूक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने घेण्यात आली.

या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे,मतदार यादी प्रसिद्ध करणे,अर्जाची छाननी करणे, सूचक,अनुमोदक,अपूर्ण अर्ज बाद करणे,अर्ज मागे घेणे, प्रचार करणे या सर्व बाबी करण्यात आल्या. मतदान कक्ष,मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी नेमण्यात आले.शेवटी मतदान घेवून निकाल जाहीर करण्यात आला. या उपक्रमातून लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.

भारतीय लोकशाहीतला प्रौढ मताधिकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजला, योग्य उमेदवार निवडणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणे इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करणे या जबाबदाऱ्यांची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. आई-वडील किंवा घरातील इतर प्रौढ व्यक्ती मतदान करतात मग ती प्रक्रिया कशी असेल ? विद्यार्थ्यांचा मनातील या जिज्ञासेचे उत्तर स्वतः विद्यार्थ्यांना कृतीतून मिळाले.

प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणे शाळेतील शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले या मध्ये प च्या माध्यमातून ईव्हीएम मशीन तयार करण्यात आले त्यावर उमेदवारांचे नाव आणि फोटो ऍड करून बॅलेट आणि कंट्रोल युनिट तयार करण्यात आले.इच्छुक उमेदवारांना




प्रचारासाठी दोन दिवस वेळ देण्यात आला.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अभिरुप मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून मतदान प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.या निवडणुकीसाठी ९ उमेदवार आणि शेवटी छजढ अशी रचना र्शीं वर करण्यात आली होती. सदरील ईव्हीएम वर आजची मतदान प्रक्रिया पार पडली.शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक यांनी सहभाग घेतला.एकूण मतदान ११८ झाले.शेवटी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व उमेदवार व मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मतमोजणी करून निकाल जाहीर केला, शाळेतील विद्यार्थिनी चैताली बाळू ढोले हिला ६० मतदान झाले तिला ४८ मतांनी विजेता घोषित करण्यात आले. तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी

> ● **प्रत्यक्ष मतदान करून बुथच्या बाहेर आल्यावर प्रौढ मतदारांनाही होणार नाही एवढा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. शाळेत शिकवलेला प्रौढ मताधिकार बजावताना विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड घालण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.**
> **– मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे, जि.प.प्रा.शा.नफरवाडी ता.पाटोदा जि.बीड**

नवनिर्वाचित मुख्यमंत्री चैताली हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.चैताली ढोले हिने आपले मनोगत व्यक्त करून सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.या निवडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची या गीतावर ठेका धरत नृत्य करत आनंद साजरा केला. उमेदवार म्हणून चैताली ढोले,सोहम मंडलिक,जयराम वाघ,विठ्ठल दराडे,दिपाली ढोले,दर्शन मंडलिक,काजल दराडे,राधिका मंडलिक, भूमिका मंडलिक हे होते.

प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये केंद्राध्यक्ष सोहम वायकर आणि श्रेयस ढेरे,मतदान अधिकारी १ आरती सवासे,मतदान अधिकारी २ सविता मुळे,मतदान अधिकारी ३ कल्याणी तळेकर तसेच मतदान प्रतिनिधी म्हणून समृद्धी तांबे,सुजाता सस्ते,साक्षी तांबे,महेश दराडे यांनी कामकाज केले.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर तसेच शाळेतील शिक्षक सचिन राऊत सर, रमेश मुरूमकर सर,शकुंतला काकडे मॅडम,सारिका वावरे मॅडम यांनी काम पाहिले.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६००/२०२५**

**सुंदराबाई भ्र. पांडुरंग धुताडमल व ईतर ४ विरुद्ध निरंक**

ज्याअर्थी मयत नामे पांडुरंग तुकाराम धुताडमल हे दिनांक २८/०४/२०२५ रोजी टाकळगाव, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १. सुंदराबाई भ्र. पांडुरंग धुताडमल, वय ७२ वर्षे धंदा घरकाम, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, २. श्रीराम पि. पांडुरंग धुताडमल, वय ४१ वर्षे धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ३. सुनिल पि. पांडुरंग धुताडमल, वय ३७ वर्षे धंदा - शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ४. सुरेश पि. पांडुरंग धुताडमल, वय ३६ वर्षे, धंदा शेती , रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड, ह.मु. गंधर्व पार्क, काळजेवाडी, चऱ्होली खुर्द, पुणे, ५. रेखा भ्र. राजेंद्र दुनघव, वय ४७ वर्षे धंदा घरकाम, रा. छत्रपती चौक जवळ, ज्ञानेश्वर पार्क, कृष्णा नगर रोड, पुणे.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पांडुरंग तुकाराम धुताडमल रा. मौजे टाकळगाव, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २०.०८.२०२५**
**(मार्फत ॲड. एम. डी. धांडे )**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५ पान ४

## पत्रकारांसाठी रविवारी एक दिवसीय कार्यशाळा; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एक दिवसीय कार्यशाळा रविवार, २० जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात होणार आहे. मूळ वर्धा जिल्ह्यातील व सध्या परभणीमध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ महाविद्यालयात शिक्षक असलेले दीपक रंगारी 'वृत्तसंकलन-संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व', माध्यम तज्ज्ञ आणि पत्रकारितेची पायवाट आणि संरक्षण पत्रकारिता या ग्रंथांचे लेखक प्रा. शिवशंकर पटवारी 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर तर 'समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये' यावर छत्रपती संभाजी नगर येथील माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे मार्गदर्शन करणार आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# कर्कश्य आवाज करणाऱ्या बुलेट सायलेन्सर वर अंबाजोगाई वाहतूक शाखेचे बुलडोजर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई वाहनधारकांच्या कर्कश्य सायलंसरच्या आवाजाने अंबाजोगाई शहरातील नागरीक त्रास झाले होते याबाबत प्रसार माध्यमांनी आवाज उठविल्यानंतर बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पीआय शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाने वाहतूक पोलिसांच्या पथकाने आज गुरुवार दि १७ रोजी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ३० बुलेट सायलेन्सर वर बुलडोझर फिरवण्यात आले .

मागील कित्येक महिन्यापासून अंबाजोगाई शहरात कर्णकर्कश हॉर्न, लावून बुलेट अती आवाजाने नागरिक पूर्ण त्रस्त झाले होते. काही हृदय रोगी वयोवृद्ध नागरिकांना रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागले आहेत. सामान्य नागरिकांना होत असलेल्या त्रासामुळे माध्यमांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून आवाज उठविला होता. याची दखल घेत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी अंबाजोगाईत संवाद बैठक घेतल्यानंतर अंबाजोगाई येथील वाहतूक शाखेच्या पथकाला सूचना केल्या कर्कश्य आवाज करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करावी व त्या बुलेटचे सायलेन्सर काढून पोलीस स्टेशनला जमा करण्यात यावे ते जमा केलेले सर्व सायलेन्सर आज रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकाळी ११ वाजता जमिनीवर अंथरूण त्यावर बुलडोजर फिरवण्यात आले. यामुळे मोठ्या आवाज करणाऱ्या वाहनधारकांना चांगलाच चाप बसणार आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात शाळा व ट्युशन साठी अल्पवयीन मुले मुली ज्या गाड्या चालवतात त्यांच्यावरही वाहतूक पोलिसांची बारीक नजर असणार आहे त्यांच्याकडून अपघात घडला तर त्यांच्या पालकांना कारवाईला सामोरे जावे लागेल असे स्पष्टपणे सुचित करण्यात आले

अंबाजोगाई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी झालेल्या कारवाईत ए पीआय कांबळे, वाहतूक पोलीस मधुकर रोडे, पीडी फड, बाळासाहेब पारवे, पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत चादर,दत्तात्रे इंगळे, कृष्णा वडकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

## अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली मुंबईमध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**



हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन आणि महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे साहेब व संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, तालुकाप्रमुख वडवणी माऊली गोंडे, तालुकाप्रमुख धारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातून रामदास भाई ढगे, संदिप माने, शिवाजी सावंत, महादेव मस्के, रमेश कुरकुटे, दत्ता सावंत, रमेश चौधरी, ज्ञानेश्वर मोरे, शिवाजी गोंडे, माऊली आगलावे. धारूर तालुक्यातून अनंत चिंचाळकर, शेख गफार शेख सत्तार, वशिष्ठ सातपुते , अनिल गांजले, सुनील कोमटवार, अमोल शिरसाट, दीपक चिद्रवार, विशाल भैरे यांच्या समावेत असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी काल दि. १५ जुलै २०२५ रोजी रात्री११ वाजता दरम्यान मुक्तागिरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोदा पंचायत समितीची कोट्यवधींची नवीन इमारत धुळखात पडुन; येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी उद्घाटन होणार का?

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाच वर्षांपूर्वी बांधून पूर्ण झालेली पाटोदा पंचायत समितीची नवी इमारत अजूनही धुळखात पडून आहे. बीड जिल्ह्यातील बहुतेक पंचायत समित्या नव्या इमरतीत कार्यरत असताना, पाटोदा मात्र तांत्रिक कारणांची ढाल पुढे करत कोट्यवधी रुपयांची इमारत वापरात आणण्यात अपयशी ठरली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजन शून्यतेवर सवाल निर्माण होत आहेत.या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली, परंतु अद्याप अधिकृत उद्घाटन झालेले नाही. दरवर्षी नवीन तारखा देऊन ही बाब पुढे ढकलली जात आहे. आता जनतेच्या मनात प्रश्न आहे – या येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी या इमारतीचे उद्घाटन होणार का तालुक्यातील नागरीक, ग्राम पंचायतीचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व स्थानिक नेते यांच्यातही या मुद्द्यावरून नाराजी ▶▶ उर्वरित पान २ वर

## सेवा सप्ताह अंतर्गत वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह अंतर्गत दुसऱ्या दिवशी दि १६ बुधवार रोजी मोदी लर्निंग सेंटरच्या प्रांगनाभोवती विविध झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच गुरुवार दि १७ रोजी मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेनुसार १५ ते २२ जुलै दरम्यान आज दुसऱ्या दिवशी दि १६ रोजी वृक्षारोपनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या अंतर्गत मोदी लर्निंग सेंटरच्या भव्य अशा प्रांगनाभोवती विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.त्याचबरोबर गुरुवारी जोधाप्रसादजी मोदी तसेच मानव विकास अपंग व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पेन, पेन्सिल चित्रकला वही, ▶▶ उर्वरित पान २ वर

## नारायण गडाची बदनामी खपवून घेतली जाणार नाही: गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील लाखो भक्तांनचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडाविषयी व गुरुवर्य शिवाजी महाराजविषयी काही विश्वस्त व काही लोक जाणीवपूर्वक बदनामी करत असुन गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न करिता आहेत आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी नगद नारायण गडावर जाऊन शिवाजी महाराज यांची भेट घेतली व त्यांचा सत्कार करुन आशिर्वाद घेतले , यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी शिवाजी महाराज यांना सांगितले की ,बाबा नारायण गडाविषयी चाललेली बदनामी बघुन मी व्यथित झालो असुन आपल्या भेटीसाठी आलेलो आहे व कोण जाणीवपूर्वक बदनामी करत आहे व यामागे कोणाचा हात आहे हे मी लवकरच बाहेर ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रा.बाळासाहेब देशमुख यांना पित्र शोक



**शिरसाळा । प्रतिनिधी**

गोवर्धन ता. परळी येथील प्राध्यापक बाळासाहेब लक्ष्मणराव देशमुख यांचे वडील लक्ष्मण दादाराव देशमुख यांचे दिनांक १६/७/२०२५ रोजी दुपारी दीड वाजता अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ७५ वर्ष एवढे होते त्यांच्या पाश्चात त्यांना एक मुलगा एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे देशमुख परिवाराच्या दुःखात सहभागी आहोत सावडण्याचा विधी उद्या दिनांक १८ जुलै २०२५ रोजी सकाळी आठ वाजता होईल.

# महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या वतीने काम बंद आंदोलन सुरु

### मागण्या मान्य झाल्या नाही तर उद्यापासून बेमुदत संपावर जाणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात राज्य परिचारिका संघटनेने विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. यामध्ये प्रामुख्याने सातव्या वेतन आयोगानुसार वेतनातील असमानता आणि कंत्राटी परिचारिका भरतीला विरोध करणे, तसेच इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे.

राज्यातील परिचारिकांच्या बाह्य स्त्रोताद्वारे पदभरती व इतर संवेदनशील प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर, संघटनेने आपल्या सर्व शाखासह राज्यव्यापी आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील परिचारिका आपल्या सर्व सभासदासह सहभागी झाल्या आहेत.दि. १५ व १६ जुलै २०२२५ धरणे आंदोलन व निदर्शने आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आले होते.मात्र या वेळी त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या नाही.त्यामुळे दि.१७ जुलै २०२५ रोजी एक दिवस काम बंद आंदोलन करण्यात येत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

**आंदोलनाची दिशा**

**आज संघटना व सरकारसोबत चर्चा करण्यात येणार असून यावेळी त्यांनी मागण्या मान्य केल्या नाहीत तर उद्यापासून बेमुदत संपावर जाणार आहोत.– आशा यादव, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा अंबाजोगाई**

## उद्या वसंतराव काळे महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

### पो. अ. नवनीत कांवत यांच्या हस्ते उद्घाटन

**वडवणी । प्रतिनिधी**



आज स्पर्धेच्या आणि गतिमान युगात विद्यार्थ्यांना योग्य करिअर निवड करण्यासाठी व्यापक मार्गदर्शन व्हावे म्हणून आय टी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी या विषयावर पुणे येथील आयटी क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शनपर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय बीड आणि संभाजी राजे ग्रंथालय व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयटी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे दिनांक: १९ जुलै २०२५ वार शनिवार सकाळी:१०:३० ते ०३:३० वा. या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०:३० वा. बीड पोलीस अधीक्षक मा. श्री. नवनीतजी कांवत साहेब यांच्या हस्ते ▶▶ उर्वरित पान २ वर

